वयोवृद्धः मनोयुवा

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम), मुंबई

संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी क्रमांक : बी.ओ.एम./८४३/८/जीबीबीएसडी दि. २६/११/१९८१
मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम १९५० अन्वये नोंदणी क्रमांक : एफ-७५२८ (मुंबई) दि. २५/४/१९८२
कार्यालय पत्ता : ज्येष्ठ नागरिक भवन, सेक्टर १२, प्लॉट नं. ७ सी, गावदेवी मंदिरामागे, नेरूळ (प.), नवी मुंबई - ४०० ७०६.

फेस्कॉमचे मुखपत्र : मनोहारी मनोयुवा

कार्यालय : अ/७, मिरज-मालगांव रस्ता, सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली - ४१६ ४३७.

वर्ष-३० अंक-१२ डिसेंबर २०२२

फेस्कॉमच्या ४२ व्या वर्धापन दिनानिमित्त सर्व ज्येष्ठ नागरिक बंधू-भगिनींना हार्दिक शुभेच्छा..!

डॉ. राधाकृष्ण भट

(९ जुलै १९४३ - १७ फेब्रुवारी २००९)

संस्थापक
महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम)

आधारस्तंभ

श्रीमती कुमुदिनी दत्तात्रय बिले

पत्ता : 'कुमुद' २०२० अभिनवनगर, मु. पो./ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग - ४१६ ५२०.

जन्मतारीख : ०६ जून १९४१

मोबाईल नं. : ९४०४४४६५८२

सेवा : निवृत्त आरोग्य सेविका

छंद : समाजसेवा, वाचन.

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम)

वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा

जयवंत सोमवाड
(सचिव)

अशोक तेरकर
(अध्यक्ष)

उत्तर मराठवाडा प्रादेशिक विभाग

अध्यक्ष
समन्वय समिती ज्येष्ठ नागरिक संघ, डोंबिवली (प.)

अध्यक्ष
आधार ज्येष्ठ नागरिक संघ, सुभाषनगर.
ता. मिरज, जि. सांगली.

श्री. डी. एस. घोलराखे
अध्यक्ष
राजर्षी शाहू ज्येष्ठ नागरिक संघ, कोल्हापूर.

वसंतराव थोरात
भारतरत्न ज्येष्ठ नागरिक संघ, कोल्हापूर

दिलीप पेटकर
अध्यक्ष, सागरमाळ परिसर
ज्येष्ठ नागरिक संघ, कोल्हापूर

☎:(02562) 237711
: 90110 12023
: 83294 73206

जगदीश झाजरिया
विक्रीकर उपायुक्त (सेवानिवृत्त)
अध्यक्ष : महाराजा अग्रसेन जेष्ठ नागरिक संघ, धुळे.
"सुरज", रागरंग कॉलनी, वल्लभ नगर, मालेगाव रोड
धुळे ४२४००१ (महाराष्ट्र)
Email :- zazria@gmail.com

आवाहन

प्रशिक्षण – भाग ३

फेस्कॉमच्या वतीने ऑगस्ट २००२ पासून ज्येष्ठ नागरिक चळवळ आणि त्यायोगे पदाधिकारी अधिक गतीमान व्हावेत या उद्देशाने प्रशिक्षण शिबीरे घेतली जात असुन जिल्हा /तालुका / शहर समन्वय समितीचे अध्यक्ष, सचिव व पदाधिकारी यांचे प्रशिक्षण शिबीर दि.१५/१०/२०२२ व दि.१६/१०/२०२२ रोजी नेरूळ भवन (मुंबई) येथे संपन्न झाले.

या प्रशिक्षण शिबीरात अध्यक्ष अरुण रोडे, ॲड.प्रमोद ढोकले, भवन समिती संस्थेचे अध्यक्ष ना.ना.इंगळे, उपाध्यक्ष व मनोयुवा कौन्सिलचे प्रमुख अंजुमन खान, मुख्य सचिव विवेक देशपांडे, पुणे प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष चंद्रकांत महामुनी यांनी विविध विषयावर सखोल मार्गदर्शन केले. उपस्थितांना परिपूर्ण माहिती मिळावी असा सर्वांनी प्रयत्न केला. अध्यक्ष अरुण रोडे यांनी फेस्कॉमचे कार्य उपस्थितांसमोर ठेवले. ना.ना.इंगळे यांनी ज्येष्ठ नागरिक धोरणाची पाने उलगडुन खुलासा केला.

या दोन दिवसांच्या प्रशिक्षण कालावधीत उपस्थितांना नवनवीन माहिती मिळु शकली. फेस्कॉम म्हणजे काय? ज्येष्ठांसाठी काय करते? हे देखील समजले.

या प्रशिक्षणातील तीन विषयांवरील ३ गटात चर्चा झाली. या चर्चेद्वारा विविध गटांनी समन्वय समितीच्या कार्याबद्दल काही मुद्दे फेस्कॉम समोर मांडले आहेत. तेही विचारणीय आहेत. परंतु थोडसं स्पष्ट करावसं वाटते की मुद्दे मांडताना काहींचा अभ्यास कमी पडलेला दिसतो. ज्येष्ठ नागरिक चळवळीस चालना मिळणेसाठी **''अभ्यास''आणि ''संपर्क''** महत्वाचा आहे. याबाबत अधिक स्पष्ट करणेपेक्षा तिन्ही गटांनी उपस्थित केलेले मुद्दे ज्येष्ठ नागरिक पदाधिकारी, ज्येष्ठ नागरिक संघ, वाचक यांचे समोर ठेवत आहे. आपण प्रत्येकांनी देखील अभ्यास करावा परंतु दोष न काढता, एकमेकाचेवर आरोप न करता फक्त सूचना व्यक्त केलेस फेस्कॉमला अधिक आनंद वाटेल आणि ज्येष्ठ नागरिक चळवळ अधिकाधिक गतीमान होणेस त्याचा फायदा मिळू शकेल.

फेस्कॉमने दिलेल्या प्रशिक्षणाचा लाभ ग्रामीण भागापर्यंत पोहचावा या उद्देशाने प्रत्येक प्रादेशिक विभागाने जिल्हावार/तालुकावार प्रशिक्षण आयोजित करून प्रशिक्षित पदाधिकारी यांनी प्रत्यक्ष माहिती फेस्कॉमचे कार्य गाव पातळीपर्यंत पोहचवून ज्येष्ठ नागरिक चळवळ अधिक यशस्वी करावी असे सुचवावेस वाटते.

गट –१

विषय – समन्वय समित्यांचे फेस्कॉमच्या प्रशासकीय कामकाजातील योगदान

प्रतिनिधी :

१) रामचंद्र शंकरराव कोटलवार, २) प्रभाकर गंगाधर कुंटूरकर, ३) श्रीकांत भीमराव पत्की, ४) पी.टी. गावंडे, ५) डी. एस. पवार, ६) नारायण अंधारे, ७) रामदास वांडे, ८) परशराम जाधव, ९) राजाभाऊ देशमुख, १०) मानसिंग जगताप, ११) दिलीप पेटकर, १२) टी. बी. पाटील, १३) दिलीप गिल्डा.

मुद्दे :

गावपातळीवरील ज्येष्ठ नागरिक संघ व फेस्कॉम प्रादेशिक विभाग यांचेमध्ये संपर्क व समन्वय ठेवण्यासाठी व फेस्कॉमचे कामकाज गतिमान करण्यासाठी समन्वय समितीची आवश्यकता आहे. यामध्ये शहर, तालुका, जिल्हा पातळीवर समन्वय समितीच्या नियुक्त्या आवश्यक आहेत. या गटाने उपस्थित केलेले मुद्दे खालील प्रमाणे आहेत.

१) महासंघाचा पूर्व इतिहास माहित असणे.

२) संघटनेचे ध्येय, उद्दीष्ट, घटना व शासन स्तरावरील निर्णय व समाजाभिमुख कार्यक्रम या विषयीची माहिती असणे.

३) कार्यकर्त्यास इगो नसावा व तो पद लोभी नसावा. अहंभाव नसावा.

४) संभाषण कौशल्य असावे. शिस्त व वेळ पाळणारा असावा. कार्यकर्ता जोडणारा असावा. कामाची लाज बाळगणारा नसावा.

५) विविध उपक्रम राबविण्याची जबाबदारी घेणारा असावा.

६) ध्येय गाठण्यासाठी परिश्रम, चिकाटी व सातत्य टिकवून ठेवणारा असावा.

७) कार्यकर्त्याने संघाचे आर्थिक नियोजन करणे व निधी जमा करणे, कार्यक्रम घेणे, प्रायोजक नेमणे इत्यादी कामे करावीत.

८) महिलांचे १००० संघाचे उद्दीष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा.

९) आर्थिक लाभाच्या योजनांची माहिती, निराधार, वंचित, गरीब व मागास यांचे पर्यंत पोहोचविणे आवश्यक.

१०) संघटनेस वेळ, बुद्धी, श्रम, कौशल्य व अर्थ समर्पित करणारा असावा.

११) सभासदांच्या समस्या व अपेक्षा जाणून घेणारा असावा.

१२) फेस्कॉम व शासनाच्या योजना, उपक्रम, कार्यशाळा, नियोजनबद्ध अंमलबजावणी करणारा असावा.

१३) विद्यापीठाशी संपर्क करून ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेले आर्थिक लाभ मिळवणे तसेच उद्योजक यांना निमंत्रण देऊन निधी मिळविणे.

१४) जिल्हा समन्वय समितीच्या अध्यक्षांनी तालुका संपर्क प्रमुखांची व तालुका अध्यक्ष व सचिवांची महिन्यातून एक बैठक घेणे.

१५) खालील मुद्यांवर बैठकीत चर्चा करणे, स्मार्ट फोन व डिजिटलचा, काम्प्युटरचा वापर करावा.

१६) वार्षिक वर्गणीचा आढावा घेणे.

१७) किती संघ सक्रिय केले, किती नवीन संघ स्थापन केले, त्याबद्दल आढावा घेणे, निष्क्रिय संघ सक्रीय करणे, तालुक्याचा/गावाचा सर्व्हे करुन "गाव तिथे संघ" निर्मिती करुन फेस्कॉमला संलग्न करुन घेणे.

१८) महासंघाकडून आलेल्या सूचनांची अंमलबजावणी करणे.

१९) कार्यकर्त्यांनी मासिक डायरी लिहावी व उपस्थिती सभांचा कार्य वृत्तांत विभागास पाठवावा.

२०) अशा पध्दतीने सर्व संघातील कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला तर सर्व संघ सक्रिय राहतील व कोणताही ज्येष्ठ नागरिक लाभापासून वंचित राहणार नाही.

२१) संविधानातील घटना ३९क व ४१ प्रमाणे सर्व ज्येष्ठ नागरिकांचे उर्वरित आयुष्य निरामय, आरोग्यपूर्ण राहील व सौदार्ह्यापूर्ण वागणूक मिळेल.

२२) ज्येष्ठ नागरिक संघाचे सातत्या टिकविण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबवावेत व संस्थेतील पदाधिकारी नव्हे कार्यकर्ते यांना नेमून दिलेले कामकाज स्वेच्छेने करावे.

* * *

गट- २

"गाव तिथे संघ" या संकल्पनेत समन्वय समितीचे योगदान

प्रादेशिक विभाग मुंबई, कोकण व पुणे

सहभागी सदस्य :-

१) डॉ. पांडुरंगलाल २) पोपटराव टेमगिरे ३) प्रभाकर

जेजुरकर ४) मोहन कटारे ५) बाळासाहेब गायकवाड ६) मछिंद्र सरजीने अलदरे ७) भास्कर ताकवणे ८) किसनराव आरुटे ९) गुरुलिंग कन्नुरकर १०) मन्मथ कोल्हापुरे ११) यशवंत कोसुळकर १२) पद्माकर पाठक १३) विठ्ठल मुंगी १४) प्रकाश माने १५) रामचंद्र सुतार १६) प्रकाश कुलकर्णी १७) दत्तात्रय चाचले १८) बाळा रामबागुल

मुद्दे :-

१) समन्वय समितीने प्रथमतः तालुक्यांचा व गावांचा सर्व्हे करावा. संघ नसलेल्या गावांची माहिती गोळा करावी, ग्रामसभेला उपस्थित राहावे, नागरिकांच्या समस्या ग्रामसभेत मांडाव्यात, ज्येष्ठांना मिळणाऱ्या शासकीय सुविधा, सन २००७ व २०१० च्या कायद्याविषयीची माहिती, संघटना का असावी याचे महत्त्व ज्येष्ठ नागरिकांना सविस्तर चर्चा करुन समजावून सांगावे. यासाठी तालुका स्तरावर मेळावा आयोजित करावा.

२) संघासाठी काम करण्याची इच्छा असणारे क्रियाशील, कामाची आवड असणारे व कामासाठी वेळ देऊ शकणारे, सुशिक्षित ज्येष्ठ नागरिक तसेच राजकारण विरहित, धर्म, जातपात विरहित काम करणारे नागरिक यांचा शोध घेऊन त्यांना संघात सामील करुन घ्यावे. प्रादेशिक विभाग व तालुक्यात असणाऱ्या ज्येष्ठ नागरिक संघांशी सतत संपर्क ठेवावा. तसेच संघ स्थापन करण्यासाठी कार्यकर्त्यांच्या संपर्कात राहावे.

३) समन्वय समितीने सक्रिय संघातील पदाधिकाऱ्यांच्या मदतीने शेजारील गावात नवीन संघ स्थापनेचा प्रयत्न करावा. तसेच शक्य असेल तिथे महिलांची पुरेशी लोकसंख्या असल्यास स्वतंत्र महिला संघ स्थापन करावेत.

४) समन्वय समितीने शासकीय दवाखाने, रोटरी क्लब, धर्मादाय संस्था, सामाजिक सेवाभावी संस्था, खाजगी रुग्णालये यांच्या सहकार्याने सर्व रोग निदान ज्यामध्ये नेत्र, दंत, हृदयरोग, रक्तशर्करा, रक्तदाब तपासणी व प्रोस्टेट व्याधीचे निदान इत्यादींचा समावेश असावा.

५) फेस्कॉम ही संस्था धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असल्याने फेस्कॉमशी संलग्न असणाऱ्या ज्येष्ठ नागरिक संघाची नोंदणी मा. धर्मादाय आयुक्तांकडे करण्याची आवश्यकता वाटत नाही असे आमचे मत आहे. तसेच फेस्कॉमशी संलग्न असणाऱ्या ज्येष्ठ नागरिक संघाच्या आर्थिक व्यवहारांची तपासणी फेस्कॉमच्या अधिकृत व्यक्तीमार्फत व्हावी असे आम्हाला वाटते. ज्येष्ठ नागरिक संघाचे लेखापरिक्षण (Audit) रु. ५ लाखापर्यंतच्या आर्थिक व्यवहारासाठी माफ असावे असेही आमचे मत आहे.

६) फेस्कॉमच्या अंकित असणाऱ्या ज्येष्ठ नागरिक संघांना फेस्कॉम, समन्वय समिती सदस्य व प्रादेशिक विभागाचे पदाधिकाऱ्यांनी भेटी देऊन त्यांच्या समस्या, अडचणी जाणून घ्याव्यात.

७) फेस्कॉममार्फत ज्येष्ठ नागरिक पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यासाठी प्रशिक्षण आयोजित करावे असे आमचे मत आहे.

८) शासनाचे ज्येष्ठांसाठीचे अखर्चिक धोरण खर्चिकमध्ये रुपांतरीत करण्यासाठी फेस्कॉम स्तरावर प्रयत्न करावेत.

९) ज्येष्ठ नागरिक संघांनी सभासदांच्या सहली आयोजित कराव्यात.

१०) समन्वय समिती सदस्यांनी अकार्यक्षम संघ कार्यक्षम करण्याचा प्रयत्न करावा.

११) प्रत्येक ज्येष्ठ नागरिक संघात ज्येष्ठ नागरिक अन्याय निवारण व मार्गदर्शन समिती स्थापन करावी. समिती गठन करताना प्रत्येक संघाने त्यांच्या सोईनुसार समिती सदस्यांची संख्या ठरवावी.

***

डॉ. निर्मलकुमार फडकुले 'लोकहितवादी' पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचे हस्ते स्विकारताना फेस्कॉम अध्यक्ष अरुण रोडे.

उपाध्यक्ष विजय औंधे यांना यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांचे वतीने 'कर्तबगार ज्येष्ठ नागरिक' पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यांचे अभिनंदन.

मनोयुवा ज्येष्ठ नागरिक संघात फेस्कॉम चे कार्य व यशस्वी वाटचाल याविषयी मार्गदर्शन करतांना निवृत्त पोलीस उपअधीक्षक घोलराखेसाहेब.

सांगली येथील कार्यक्रमातील काही क्षणचित्रे फेस्कॉम अध्य३ अरुण रोडे, समाजकल्याण आयुक्त जयंत चाचरकर, न्युरोसर्जन डॉ. रविंद्र पाटील, न्यायाधीश मा. व्ही. एफ. चौगुले व इतर.

ज्येष्ठ कलाकार, गायक व सदस्य श्री. क्रांतीकुमार कुंडलिया व सौ. कुंडलिया यांचा ज्येष्ठ नागरिक महिला संघ, विश्रामबाग, सांगली चे अध्यक्ष रघुनाथराव केळकर. सोबत माजी अध्यक्ष पी. आर. देशपांडे, रंगराव शिंपुकडे व इतर

ज्येष्ठ अभिनेते व मराठी चित्रपट दिग्दर्शक आणि ज्येष्ठ नागरिक मा. विलास रकटे यांचा सत्कार करताना रंगराव देसाई व इतर

आमदार श्री. राहुलजी ढिकळे व आमदार सौ. देवयानी फरांदे ताई यांना निवेदन देताना संघटक सचिव उत्तमराव तांबे, केदुपंत भालेराव व इतर

Periodical Registered with Registrar of Newspaper for India (RNI) No. MAHMAR/2003/10732
Postal Licence Reg. No. : SGL/133/2021-2023

पिंपळगाव बसवंत येथील संघाच्या वर्धापन दिनी भास्करराव बनकर यांचे हस्ते सत्कार स्विकारताना सुरेश पवार.

ठाणे नॉर्थ ज्येष्ठ नागरिक संघात आई वडील व ज्येष्ठ नागरिक कल्याणकारी चरितार्थ कायद्याबाबत मार्गदर्शन करतांना ॲड प्रमोद ढोंकळे.

रावेर तालुक्यातील वाघोड येथे श्री कुंवरस्वामी महाराज ज्येष्ठ नागरिक संघ स्थापनेप्रसंगी.

रावेर तालुक्यातील पुनखेळा येथे छत्रपती राजे ज्येष्ठ नागरिक संघ स्थापनेप्रसंगी.

'फेस्कॉम ज्येष्ठांचे दारी' अभियान प्रसंगी वाळवा तालुक्यातील स्वातंत्र्य सैनिक भगवान चंद्रा तुळसनकर, तानाजी भागाजी माने, सज्जनराव शामराव पाटील, व सर्जेराव तुकाराम पाटील यांचा सत्कार व आशिर्वाद घेतांना सांगली प्रादेशिक विभागाचे सचिव रंगराव देसाई, आनंदराव पाटील, प्राचार्य डी..के.पाटील व पदाधिकारी.

कृपया अंक पत्त्यावर द्यावा. वितरीत न झालेस सकारण परत करावा.
अपूर्ण पत्ता ☐ /मयत ☐ /पत्ता सोडून गेले ☐ /पोस्टमन बीट क्र. ☐

प्रेषक :
श्री. अंजुमन खान
फेस्कॉम उपाध्यक्ष व प्रमुख, फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल
अ/७, सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली - ४१६ ४३७.
मोबा. ९४२२५८३००४

PRINTED MATTER

प्रति,